## प्रकरण चौथे

ढसाळांच्या कवितेचे कलारूप

ढसाळांच्या कवितेतील सामाजिक जाणीव

गोलपिठा : जाणिवांचे विशाल व समृध्ददर्शन

ढसाळांच्या कवितेतील शब्दकला

ढसाळांच्या कवितेतील प्रतिमासृष्टी

संदर्भ, टीपा इ.

---

## प्रकरण चौथे

## ढसाळांच्या कवितेचे कलारूप

---

नामदेव ढसाळ आपल्या कवितेकडे " सामाजिक क्रांतीचे साधन " म्हणून पाहाताना दिसतात. त्यांची कविता उत्कट व प्रभावी आहे. " साहित्य हे क्रांतीचे साधन " असे मानता- मानता तिने कलारूप धारण केले आहे. त्यांची कविता ही दलितांच्या चळवळीतून जन्माला आलेली आहे. वास्तवता आणि सामाजिकता ही तिची दोन महत्वांची अंगे लक्षात घेतल्यावर साहजिकच त्यांच्या कवितेची बांधिलकी ही सामाजिकतेशी आहे हे सिध्द होते. त्यांच्या कवितेतून सामूहिक जाणीव सतत व्यक्त होते. समुहनिष्ठा ही उत्कट झाली की, तिचे कवितापण कमी होते असा काहींचा समज आहे, तथापि दलित कवितेमध्ये आलेली सामूहिक जाणीव ही तो ज्या संबंध समाजात वावरतो,त्याची म्हणून आलेली असते. कवीने घेतलेला अनुभव हा व्यक्तिनिष्ठ असतोच परंतु अन्यायाविरूध्द घेतलेली चीड, विद्रोह हे मात्र त्या संबंध समाजाचे असते --- ललित वाङ्मयात आत्म - निष्ठेला प्राधान्य असते हे विवाद्यच आहे. पण ही आत्मनिष्ठा जितकी निरामय असेल, उत्कट आणि अविचल असेल तितकी ती कलाकृती अधिक जिवंत , प्रभावी आणि परिणामकारक होत असते.

SHIVAJI UNIVERSITY

ढसाळांच्या दलित कवितेतला " मी " व्यक्ती म्हणून येत नाही. हा " मी " समुहोच्चार असतो. विस्थापितांच्या क्रांती प्रवासाचे ढसाळ हे माध्यम झालेले आहेत. त्यांनी व्यक्तीगत सुख:दुखे ही सामाजिक जाणिवेतून लक्षात घेतली आहेत. या त्यांच्या कवितातून " मी " च्या मुखातून व्यक्ती बोलत नसून एक प्रक्रिया बोलते आहे. विस्थापित व्यवस्था बोलते आहे.त्याची ही आत्मनिष्ठा अशी समुहनिष्ठा बनली आहे. ती निरामय,उत्कट,अविचल असल्याने त्यांची कविता ही कलाकृती, जिवंत-प्रभावी-परिणामकारक कलाकृती बनली आहे !

ढसाळांची कविता वाङ्मयात कलाकृती म्हणून जागा मिळविण्यासाठी जन्माला आलेली नाही.वाङ्मय होणे ही तिच्या कार्याची अंतिम फलश्रुती आहे. एक परिणाम आहे. पण त्या परिणामासाठी तिचा जन्म नाही. समाजाच्या वास्तवाच्या पुनर्मांडणीच्या प्रक्रियेत सहभाग हा तिचा जन्म हेतु असताना ती कलारूप धारण करताना दिसते " श्रेष्ठ साहित्यात वा कलेत आविष्काराला वा रूपाला महत्व नसून त्यात व्यक्त झालेल्या आशयात वा विषयवस्तूत सामावलेल्या मानवी मूल्यांचा आवाका आणि सखोलता याना असते " कलावादाचे अध्वर्यू वाल्टर पेटर यांचे हे विधान लक्षात घेऊनच नामदेव ढसाळाच्या कविताच्या कलारूपाची मीमांसा करावी लागेल.

## ढसाळांच्या कवितेतील सामाजिक जाणीव

दलित कवींच्या कवितेत जो जीवनानुभव व्यक्त होतो, तो ते ज्या समाजात जगत असतात त्या समाजात असतो. चोख्याच्या अभंगातून जे दु:ख व्यक्त झाले ते एकट्या चोख्याचे नव्हते ते माणुसकीचा हक्क नाकारलेल्या दलित समाजाचे दु:ख होते. ढसाळांच्या कविता " स्वगता " सारखी आहे. पण "स्वगता" चा उगम माणूस म्हणून जगणे नाकारणाऱ्या समाजाच्या

विरुध्द उदयाला आलेल्या विद्रोहात आहे. शतकानुशतके भोगाव्या लागणाऱ्या वेदनेत आहे. म्हणून पांढरपेशांना निरुत्तर करणारे प्रश्न ढसाळांची कविता विचारते.

(ढसाळांची कविता दलित जाणिवांना आकार देते. त्यांची कविता संघर्षाला सामोरी जाणारी,प्रस्थापित मूल्ये उधळून देणारी आणि माणूस म्हणून जगण्याचा हक्क मिळवू पाहणारी लढाऊ कविता आहे. नुसते " गोलपिठा " जीवनाचे दाहक भान आणून देणे हे तिचे उद्दिष्ट नाही, तर " माणूस " म्हणून जगण्याचा हक्क मिळवू पाहाणाऱ्या समाजाच्या मनातला धुमसत राहिलेला अंगार त्यांच्या कवितेत व्यक्त होतो आणि तोच त्यांच्या कवितेचा उद्देश आहे.)

यशवंत मनोहर सांगतात[१] त्याप्रमाणे लोकशाही समाजवादाचा स्पष्ट प्रखर आशय या कवितेचे प्रेरक स्थान आहे मराठीपुरता तळागाळाच्याच एका क्रांतिमान मानवाचा विचार या कवितेत हृदयसम्राट झालेला आहे. मराठी कवितेत यापूर्वी असा चमत्कार घडला नव्हता दलित कवितेतला "मी" व्यक्ती म्हणून येत नाही. हा "मी " समुहोच्चार असतो. विस्थापितांच्या क्रांतिप्रवासाचे कवी हा माध्यम झालेला असतो. व्यक्तिगत सुखदु:खे तो सामाजिक जाणिवेतूनच लक्षात घेत असतो. समाजाशी हा समरूपच असतो. उत्थापनाशी तो मी एकजीवच होऊन येतो. या " मी" च्या मुखातून व्यक्ती बोलत नसते. एक प्रक्रिया बोलत असते. विस्थापित व्यवस्था बोलत असते.डाव्या शक्ती बोलत असतात.

व्यक्तीमनांतून समष्टीकडे जाणारी आणि अनुभवाला रोखठोक व सडेतोडपणे व्यक्त करणारी ही कविता मराठी कवितेवर साचलेपणाचा आलेला तवंग खरडून टाकणारी आहे.

दलित कवितेतून सामूहिक जाणीव सतत व्यक्त होत राहते. समूहनिष्ठा ही उत्कट झाली की, तिचे कवितापण कमी होते असा काहींचा समज आहे.तथापि दलित कवितेमध्ये आलेली सामूहिक जाणीव ही तो ज्या संबंध समाजात वाढतो, त्याची म्हणून आलेली असते. कवीने घेतलेला अनुभव हा व्यक्तिनिष्ठ असतोच परंतु अन्याया विरुध्द घेतलेली चीड, विद्रोह हे मात्र त्या संबंध समाजाचे असते. प्रा. रा.ग.जाधव एके ठिकाणी म्हणतात[२] " दलित व्यक्तिचा टाहो हे दलित साहित्याचे मुख्य अधिष्ठान आहे. दलितेतर व्यक्तीला साम्यवादाच्या,अस्तित्ववादाच्या आणि वास्तववादाच्या कोणत्याही बेरीज वजाबाकीने हे अधिष्ठान प्राप्त होणार नाही. आज उद्याचे विद्रोही साहित्यिक दलित व्यक्तीच्या रात्रंदिन चाललेल्या या युध्दप्रसंगाची गाथा कशी रचतात यावरच त्याचे स्वत्व व सामर्थ्य अवलंबून आहे." आणि खरोखरच दलित कवीतील कलावंतात अक्षरश: अहोरात्र युध्दाचा प्रसंग आहे.(कवीने घेतलेला अनुभव त्याची कविता यामध्ये कवीचे व्यक्तीमत्व असते व हे व्यक्तिमत्व त्या कवितारूपाला स्वतंत्र अर्थ देत असते. विषाद, दु:ख, नैराश्य,आशावाद, व्देष, विध्वंस,विधायक रचना निर्मिती,आव्हानात्मक जीवनमूल्या विषयीची नितांत श्रध्दा अशा कितीतरी जाणिवांनी दलित कवितेतून व्यक्त होत असलेली सामाजिक जाणीव समृध्द आहे.तिला अनेक रंग लाभलेले आहेत.माणसाना फक्त माणुसकीची मागणी करणाऱ्या या कवितेचे अंतरंग सामाजिक जाणिवांनी भरलेले आहे. त्यामध्ये तिला परंपरेने जाणवलेल्या व्यथा वेदनांचे जग आहे. त्याची नाना प्रकारची चित्रे या कवितामध्ये रेखाटलेली आहेत. झोपडपट्टीतील वस्ती,वेश्येचे जग, गोलपिठ्यावरचे जग, गावकुसाबाहेरचे जग, पोटासाठी हिमालयाइतकी ओझी उचलावी लागणाऱ्या या माणसांची जी चित्रविचित्र अनुभव सृष्टी आहे, त्या अनुभव सृष्टीची,त्यातील अनेक प्रकारच्या ताणतणावाची रूपे या कवितेमधून व्यक्त झालेली आहेत, माणसातील, दलित-दलितेतर माणसातील परस्पर संबंधातून निर्माण झालेली ही अनेक संघर्षाची चित्रणे या कवितामध्ये आहेत)

या दलित कवितेतून व्यक्त झालेली व होणारी अनुभूती व्यक्तिसापेक्ष नसून प्रातिनिधिक आहे. दलित कवीला जाणवणारे दु:ख-भाव हे केवळ त्या व्यक्तीचे नसतात तर ते ज्या सामाजिक स्तरात तो जगतो त्या स्तराचे असतात. नामदेव ढसाळांनी स्वत:च्या जळजळीत जीवनानुभवाचे स्वत:शीच केलेले चिंतन त्यांच्या कवितेचे अपरिहार्य रूप बनले आहे.[३]

नामदेव ढसाळांच्या कवितेची भूक सामाजिक आहे. ही कविता दलितांच्या चळवळीतून जन्माला आली आहे. दलित कवींची सामाजिकतेशी बांधिलकी आहे.ढसाळांच्या कविता त्यांच्या जगण्यातून निर्माण झालेल्या आहेत.त्यांची कविता दलितांच्या जीवनाचे केवळ चित्रण करीत नाही, तर त्यांच्या आयुष्यांच्या ससेहोलपटीची कारणे ती शोधते,त्या आयुष्यांचा अंतर्वेध घेते.

दलित कवितेची भूक सामाजिक आहे आणि त्यातूनच एक महत्वाचा विचार स्पष्ट होतो तो असा की, दलित कविता ही दलितांच्या चळवळीतून जन्माला आलेली आहे. वास्तवता व सामाजिकता ही तिची दोन महत्वाची अंगे लक्षात घेतल्यावर साहजिकच दलित कवींची बांधिलकी ही सामाजिकतेशी आहे हे सिध्द होते.

समूह मनाचे ढसाळ हे जणू अग्रदूत आहेत. त्यांच्या कवितेतून समूहाच्या गर्जना ऐकू येतात तरी त्या ढसाळांच्या व्यक्तिविशिष्टतेला लेपून टाकू शकत नाहीत. ढसाळांच्या कवितेतील व्यक्तिविशिष्ट स्पंदनातूनच समूहमनाचे घनगर्जन ऐकू येते. सामाजिक चळवळीतून जन्माला येणाऱ्या कवितेच्या बाबतीत असे होणे अत्यंत अवघड असते.ढसाळांनी ते आत्मसात केले आहे.

दलित कवींना सामाजिक व आर्थिक विषमतेचे पूर्ण निर्मूलन हवे आहे. दलित कवितेला हे परिवर्तनाचे तत्वज्ञान अपरिहार्यपणे अंगिकारावे लागेल.कारण

परिवर्तन व ते ही समग्र परिवर्तन झाल्याशिवाय नव्या व्यवस्थेचा जन्म होणार नाही. काही जणांना वाटते की, प्रचलित जातिव्यवस्था वा वर्णव्यवस्था यांना धक्का न लावता आर्थिक परिवर्तन घडवून आणावे पण हे शक्य नसते -- अस्पृश्यतेला कारण इथला हिंदूधर्म आहे. परंपरागत संस्कृती आहे. धर्मग्रंथ आहेत. वर्षानुवर्षे विषमता पोसणारी समाज व्यवस्था-रचना आहे. म्हणून अस्पृश्यतेचे निर्मूलन करावयाचे म्हणजे इथल्या व्यवस्थेला, गुलामगिरीला, शोषक प्रवृत्तीला सुरूंग लावून उध्वस्त करण्यासाठी दलित कवितेला परिवर्तननिष्ठ, सामाजिक बांधिलकी स्वीकारावी लागणार असे डॉ. भालचंद्र फडके यांना वाटते.[४] नामदेव ढसाळांच्या कवितेने ही सामाजिक बांधिलकी स्वीकारली आहे.

(जीवनानुभवाबरोबरच या कवितेतून ढसाळांचे खास व्यक्तिमत्वही प्रकट होताना दिसते. काव्यगत जीवनानुभव, तो घेणारा कवीतील माणूस, त्याचे अर्थ लावणारा विचारवंत, त्याचा आविष्कार करणारा कलावंत आणि हे जीवन बदलण्यासाठी युध्दसज्ज झालेला लढाऊ कार्यकर्ता हे सर्व घटक ढसाळांच्या कवितेत एकजीव झालेले दिसतात. म्हणूनच ढसाळांच्या कवितेतून दु:खग्रस्त, विषादपूर्ण, भ्रमनिरस्त, प्रक्षुब्ध, प्रलयकांक्षी आणि जुन्यांचा संपूर्ण विनाश करून नव्या जगाच्या निर्मितीचे स्वप्न पाहणारे आशावादी मन प्रकट होताना दिसते. या सगळ्या मनोवस्था कोणत्या ना कोणत्या अनुभवाने केलेल्या जखमेने ढसाळांच्या कवितेत जाग्या होतात. त्या अनुभवांशी त्या सेंद्रियपणे निगडीत झालेल्या असल्याने त्या उपऱ्या वाटत नाहीत) सामाजिकता आणि वैयक्तिकता, वैचारिकता आणि भावपूर्णता या या साऱ्यांना ढसाळांच्या कवितेतील अनुभवजन्य मनोवस्थांनी असे अविभाज्यपणे आविष्कृत केलेले आहे.[५]

(नामदेव ढसाळादी दलित साहित्यिकांच्या वाङ्मयात व्यक्तीचे दु:ख ते समाजाचे दु:ख असते. इथे व्यक्ती म्हणजे समाज आणि समाज म्हणजे

व्यक्ती असे समीकरण झालेले आहे. दुसरी गोष्ट दलितांचे दु:ख व व्यक्ती अलग नाही. व्यक्ती म्हणजे दु:ख व दु:ख म्हणजे व्यक्ती, तसेच समाज व दु:ख हे अलग नाहीत. दु:ख म्हणजे समाज व समाज म्हणजे दु:ख असेच हे नाते आहे. नामदेव ढसाळांच्या साहित्यात म्हणूनच दु:खालाच व्यक्तित्व आलेले आहे. म्हणून त्याची कविता ही व्यक्तीची कविता राहात नसून त्या समाजाची कविता -- बनते.) शंकरराव खरातांच्या विवेचना वरून वरील निष्कर्ष काढता येतो.[6]

## गोळपिठा : जाणिवाचे विशाल व समृध्द दर्शन

दलित कवितेने मराठी कवितेचे अनुभवक्षेत्र विस्तारले आहे. आज पर्यन्त हे जीवनदर्शन मराठी कवितेला अनोखे होते. ते जीवनदर्शन गर्द हिरव्या घुमाऱ्यासारखे या कवितेमधून रसरसत साकार झाले आहे. दलित कविता ही खऱ्या अर्थाने सामाजिक बांधिलकीची सुस्पष्ट जाणीव असणारी कविता आहे. समोरच्या भीषण वास्तवाला धीटपणे सामोरी जाणारी कविता आहे. ज्यांनी दलितांचे पध्दतशीर शोषण केले, त्यांच्यावर प्रहार करणारी आहे. त्यांच्याशी विद्रोह करणारी आहे.

दलित कविता जाणिवाचे क्षेत्र विशाल आणि समृध्द करीत आहे. नामदेव ढसाळांच्या गोलपिठ्यामध्ये असेच विशाल व समृध्द जीवनदर्शन आहे. गावकुसाबाहेर घडणारे विराट भारत दर्शन या कवितांच्या हुंकारामधून जाणवत आहे. दांभिक इतिहास, निषिध्द परंपरा आणि भोंदांचे वासनाकांड यावरती प्रहारकरणारी ही कविता आहे. गोलपिठ्यावरचे जीवन जगणारी, गावकुसाबाहेर वावरणारी, फुटपाथवर आयुष्य घालविणारी, ना निवारा, ना अन्नवस्त्र अशी असलेली आणि दारिद्र्याच्या दु:खाच्या अनंत वेदनांनी

SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

दडपलेली आयुष्ये या दलित कविता मधून पाठोपाठ येत गेली आहेत. चंद्र,सूर्य, खळाळणारा निसर्ग, किंवा झाडा-पानांच्या सहवासात ही कविता रमू शकत नाही. तो तिचा पिंडही नव्हे.मराठी कवितेला आता पर्यन्त अपरिचित असलेल्या अनुभव क्षेत्राचे विशाल दालन खोलून ही कविता जाणिवांचे क्षेत्र समृध्द करीत चालली आहे.

नामदेव ढसाळांची कविता ही त्यांच्या जीवनातून,जगण्यातून निर्माण झालेली आहे,म्हणून केवळ ती दलितांच्या जीवनाचे चित्रण वा वर्तन करीत नाही, तर त्या जळत्या आयुष्यापाठीमागे असलेली कारणे ती शोधते.त्यांचा अंतर्वेध घेऊ इच्छिते. आणि जीवनावर ती भाष्यही करते.) समाज व्यवस्था ही मानव निर्मित आहे व ती बदलण्याची शक्ती दलितांच्या जवळ येऊ लागलेली आहे. याची साक्ष त्यांच्या कवितामधून लाभते.नुसत्या भाकरीवर मनुष्य जगत नाही हे खरे असले तरीपण ज्यांनी भाकरीसुध्दा मिळू दिली नाही,त्यांना दलितांच्या मनाचे काय ? " भाकरीचा चंद्र शोधण्यातच जिंदगी बरबाद झाली " असे हे जळणारे, कुढणारे,उपेक्षिताचे,अन्यायाचे, दारिद्र्याचे आणि लाचारीचे जिणे आहे, त्या जीवनावर भाष्य करणारी ही कविता आहे. असे जीवनावरचे तिखट भाष्य दलित कवितेत प्रत्ययास येते.

(नामदेव ढसाळांच्या कवितामधील हे अनुभव विश्व असे इतरांपेक्षा वेगळे आहे).नुसते हे वेगळे अनुभव जरी सांगितले असले तरी त्याची कविता वेगळी ठरली असती.पण अशा वेगळेपणासाठी लेखन हा पिंड त्यांचा नाही. अनुभवाला "वस्तुदर्शित्वाचे " परिणाम तर प्राप्त झाले आहेच पण त्याच बरोबर कवीच्या संस्कारित मनाने,त्याच्या वैचारिक भूमिकेने आणि अंगभूत-आर्जित कलाविषायक भानाने या "अनुभवाला" एक निराळा अर्थ प्राप्त करून दिला आहे. तो केवळ अनुभव नाही. कवीचा अनुभव आहे.(कवीची विचार -प्रणाली, कवीची जीवनमूल्ये यांचे संस्कार त्यावर झालेले आहेत म्हणून कवितेतील जीवनानुभव केवळ वस्तुदर्शित्वाच्या पातळीवर न राहाता

HIVAJI UN

१ (काव्यात्मकतेच्या पातळीवर पोहचतो.)

## ढसाळांच्या कवितेतील शब्दकळा

शब्द कवीला हवे असतात ते अनुभवांना गोचर करण्यासाठी. अब्द अब्द मनी येते ते शब्दांत मांडण्याची कवीची धडपड असते. एखादा गडकरी नवशब्दांचे घुंगुर बांधून रसिकांची शिणलेली मने पुन: ताजीतवानी करण्यासाठी आतुर असतो. मेश्राम सारखे कवी " शब्दा" ना जपतात कारण त्यांच्या शब्दात त्यांच्या वेदना असतात. त्यांचे शब्द लिबलिबित नसतात तर ते पोलादी,कणखर असतात. एक कवी-दलित कवी म्हणून शब्दाकडे पाहण्याची दामोदर मोरे यांची भूमिका सा-याच कवी मनाचा सूर प्रकट करते.

"शब्दानो देवत्वाची खोळ पांघरून
का बसला आहात तुम्ही
असे ध्यानस्थ ?
अरे
बघवत नाहीय माझ्या मला
आत्मतृप्तीचे सोवळे नेसून
तुमचे असे सुप्त बसणे
शब्दानो,
तुम्ही हवेत मला
चरत शब्दवे चारिकम् लोकानुकंपाच
बहुजन हिताय - बहुजन सुखाय

( विमुक्त )

(ढसाळांची कविता ही विलक्षण त्वेषाने व आवेशाने बोलणारी आहे. ढसाळांच्या कवितेतील शब्द व त्यांची रचना,संताप ही वाचकाना

क्त्रावून सोडणारी, सर्वसामान्य वाचकाला - विशेषतः पांढरपेशा वाचकाला क्त्रावून टाकणारी,हादरे देणारी आहे असे कांही समीक्षकांना वाटण्याइतपत अन्य दलितांच्या कविता पेक्षा अंतर्बाह्य निराळी आहे.त्याच्या कवितातून

" पंधरा ऑगस्ट एक संशयास्पद महाकाय भगोष्ठ
स्वातंत्र्य कुठल्या गाढवीचं नाव आहे ? "

असे जे शब्द त्यांच्या ओठी येतात ते त्यांच्या जीवनाचा अपरिहार्य भाग म्हणूनच येतात.वाचकाला क्त्रावून किंवा हादरून सोडण्यासाठी नाही. (शतकानुशतके गोलपिठयावरचे जीवन जगताना कोणत्या गुळगुळीत शब्दांची अभिव्यक्ती कवितेतून व्हावी ? येथे माणसाला माणूस म्हणून किंमत नाही. स्वातंत्र्य प्राप्त होऊन अनेक वर्षे लोटली तरी वर्ण व्यवस्थेच्या व समाज व्यवस्थेच्या रचनेमुळे ज्याला देशाने,स्वातंत्र्याने काहीच दिले नाही, उलट सतत नैराश्य,लाचारी, दैन्य,अन्याय हेच दिले. त्यांच्यातील प्रक्षुब्ध झालेला कवी अशाच शब्दात आपली निर्मिती करणार.)

(नामदेव ढसाळांच्या कवितेचे त्यांच्या आयुष्यातील जखमांशी अतूट आणि फार आतले नाते आहे.अदम्य विषाद आणि क्रोध या कवितेच्या शब्दाशब्दावाटे जाळासारखा फुटत राहतो).पोरगेल्या वयातील ही हळवी आणि नाजूक होऊ बघणारी कविता जागोजाग आतल्या दाहाने करपलेली भासते.भोक्तालच्या आयुष्यातले खवगाणे आणि किळसवाणे तपशील ती अलंकारासारखे,फार मुजोरपणे मिरवताना दिसते. या तपशीलांनी नटते, मुरडते आणि मेसूर होते. हगमूत,झावणं, लवडा, लेंडाची गाडगी, जंताच्या माळा याचे नामदेव ढसाळ यांच्या कवितेतील उल्लेख उपरे राहत नाहीत. त्यांच्या सर्व कवितातून वाहणाऱ्या खोलवरच्या संतप्ततेचे ते काव्यात्म उद्गार - उद्रेक बनतात. आणि म्हणून कविताच वाटतात. शब्दांच्या नाजूकतेने कवीचे मन झांकारणे शक्यच नाही. माणसाने माणसाला

माणसातून उठवले असतांना यात काय स्वारस्य वाटणार ? असाच त्यांचा सवाल आहे.

शोषणावर उभारलेल्या संस्कृतीचा हा " जुनाट इमला " पाडायची त्यांची जिगर आहे.नव्या जगाच्या घडणीचा एकतरी दगड आपल्या हातून बसावा ही त्यांची मनोभावना आहे. मनमुक्तपणे गाणे - गुणगुणाचे असे त्यांना वाटते. अनंत बेडयानी आलेले मानसिक पंगूपण संपल्याचा साक्षात्कार विद्रोही कविता घडविते. विद्रोही करणातच सापडल्यामुळे, विस्कटलेल्या सांस्कृतिक ताऱ्यातून, पिळवटलेल्या भरड शब्दांची सुटी-सुसाट कारंजी,त्यांच्या हृदयातून उसळतात.

निर्मलकुमार फडकुले म्हणतात त्याप्रमाणे युगानुयुगे मूक राहायला भाग पाडलेल्या एका समूहाला आता शब्द मिळाले आहेत . . . असह कोंडमारा आणि असीम वेदना यांचा काळोख वर्षानुवर्षे गिळीत राहिलेल्या दलितांच्या काळजात कोंडलेला त्यांचा स्वत:चा असा एक स्वर आता आभाळाचा कर्मठ सांधा फोडायला सिध्द झाला आहे . . . आपल्यावर झालेल्या अन्यायाची जाण होऊन मनाला जाग येणे आणि त्यातून आग लावणारे शब्द जन्माला येणे ही तर नव्या संस्कृतीची प्रसववेदना आहे.(उत्तम साहित्य हा अस्वस्थतेचा,वेदनेचाच प्रामाणिक आविष्कार असतो.)

"गोलपिठा" तील जिणं म्हणजे सतरा पिढयानी मूकपणे सोसलेली विटंबना आहे. ही पिळवणूक आहे. हा पिंजरा आहे.इथलं जिणं कसं आहे ? -- तर डुकरात आणि माणसांत कदान्नासाठी स्पर्धा लागली जाते असं जीवन जगणाऱ्यांची ! ढसाळांसारखा कवी हीच गोलपिठयाची भाषा बोलणार मग ती भाषा विधानात्मक झाली तरी कांही बिघडत नाही. याचे कारण असे की,अशा विधानामध्ये प्रगट केलेला अनुभव इतका जळजळीत आणि दाहक असतो की,त्या अनुभवांचे कवीने स्वत:शीच केलेले चिंतन हे त्या कवितेचे - अपरिहार्य

" माणसाची " कल्पना ती मांडणार. ढसाळांची कविता विधानात्मक होणे अपरिहार्य आहे. कविता " विधान " करते म्हणून ती कविताच नव्हे असे म्हणता येणार नाही. त्यांच्या कवितेतील विधान ठामपणे केलेले असते आणि ते बुध्दीला व भावनांना आवाहन करीत असते. ते म्हणतात --

माणसाने पहिल्याप्रथम स्वत:ला
पूर्ण अंशाने उध्वस्त करून घ्यावे.

याचा अर्थ " गोलपिठा " च्या जगातील माणसालाच ते आवाहन करीत नाहीत तर ते त्या पलीकडे असलेल्या सुस्थिर, सुरक्षित जीवन जगणाऱ्या पांढरपेशांनाही आवाहन करीत आहेत. अशी बुध्दीला व भावनांना आवाहन करणारी ही " विधाने " कविताच आहेत हे लक्षात घ्यावे.

ढसाळांच्या कवितेत व्याकूळ करणारे, आतडी पिळवटून टाकणारे उद्‌गार ही आहेत. " पाणी " कविता त्या दृष्टीने उल्लेखनीय आहे.

"..... मागाल भीक पाण्याची
आम्ही तुम्हाला पाण्याने भरलेले रांजण देवू
हे छळ कऱ्यानो
पाण्यासारखं सुंदर कर्तव्य दुसरं कुठलचं नसतं जगात
पाणी टंचाई आली तर
तुम्ही शर्टासारखी शहरं बदलता
मग सांगा पाण्यावाचून तडफडून मरणारांनीं
काय बदलावं "

( पाणी )

---- ह्या कवितेत ही " विधाने " आहेत पण ती व्याकूळ करणारी, आतडी पिळवटून टाकणारी बुध्दीला व भावनांना आवाहन करणारी काव्यरूप विधाने आहेत.

ढसाळांच्या कवितेची भाषा त्यांच्या अनुभवविश्वाशी संवादी आहे. ते पूर्णविराम, अर्धविराम, स्वल्पविराम देत नाहीत, कारण त्यांच्या जीवनात " विराम " नाही. आहेत फक्त प्रश्न आणि उद्गार

ढसाळांच्या कवितेमध्ये येणारी भाषा आवाहनाची आहे. क्रांतीची आहे. त्यातील शब्द आणि प्रतिमा कवीच्या अनुभव विधाली सुसंगत आहेत. स्त्री, प्रेम, निसर्ग या विषयीच्या रोमँटिक, हळव्या कल्पनांना ते धक्के देतात. आणि पारंपरिक मराठी कवितेला अनुभवाचे अस्सल रूप दाखवतात. त्यांचीदृष्टी वास्तववादी आहे.) आपल्या भोवतीच्या " वास्तवाची " भयानकता ते व्यक्त करतात ----

" प्रेयसी : रांडेचं सोज्वळ रूप
प्रियकर: भडव्याचं
बायका पुरुषांच्या छापील रांडा
पुरुष बायकांचे भडवे
स्त्री पुरुषांचे संबंध
थोडयाशा रांडा, थोडेसे भडवे, थोडेसे दातवण
जे वापरल्या नंतर थुंकून टाकायचे आणि
गंगेत दात खंगाळायचे "

( ` मंदाकिनी पाटील : मला अभिप्रेत असलेले कोलाज ` )

हा कवी असे का बोलतो हे जाणून घेतले म्हणजे या कवीचे वेगळे अनुभव विश्व उलगडते.

भाषेच्या बाबतीत बोलायचे तर ढसाळांनी अक्षरश: शब्दांची जाळे तोलल्ली आहेत. शब्द लिहिण्याची - त-हा सुध्दा वेगळी आहे. " माणसं ", " थुई थुई उजाड " , " चाळूं ", " आप्लं " ,

(काही प्रमाणात इंग्रजी भाषेच्या वर्चस्वातून मराठी शब्दांची

केलेली मोडतोड ही देखील या कवितेतून जाणवते. इथे मर्ढेकरांच्या शैलीच्या या वैशिष्टयांचा परिणाम जाणवतो.) परंतु एकूण दलित कवितेचा विचार करता इंग्रजी भाषेतील शब्दांचा केलेला वापर हा नवकवितेच्या मानाने कमी आहे. परंतु ढसाळांपासून किंवा त्या आधीपासूनच या कवितेने जो जीवनानुभव दिला तो व्यक्त करण्याच्या अपरिहार्य गरजेतून अनेक शब्दांची,नव्या शब्दांची निर्मिती या कवितेने केली. अस्वस्थ, उद्विग्न मनाचे चित्रण करणाऱ्या ह्या प्रक्षोभक आणि विद्रोही कवितेने शब्दांच्यामध्ये ओतलेले चैतन्य पाहण्यासारखे आहे. पारंपरिक कवितेच्या मूल्यमापनाप्रमाणे इथे शब्दांची नजाकत नाही,अनुप्रास नाही,त्यांचे लावण्य,माधुर्य या साऱ्या कल्पना तर दूरच. केशवसुतांच्या कवितेतही असा आवेश आणि काही शब्द असे सापडतील,पण ते तेव्हा धक्के देणारे होते. इथे धक्के,केवळ धक्के देणारे शब्द नाहीत तर त्यांची पुनर्रचना,त्यांची मांडणीची पध्दत ही देखील वेगळी आहे.

" फॉस्फरस संध्याकाळ,दारूळते ग्लासात
उध्वस्त,उजाड, थुई थुई काळोख
थुई,थुई काळोखात माझे निर्बीज मरण "

" माणसाने प्लेटो,आईन्स्टाईन,आर्किमिडीज,सॉक्रेटिस
मार्क्स,अशोक,हिटलर,बिटलर,कामू,सार्त्र,काफ्का
- - - - -
ज्ञानेश्वर वगैरे वगैरेंना त्यांच्या शब्दांसकट गटाराचे
मेनहोल उघडून त्यात सडत सडत्व ठेवावे "

मययेबाज दूध, रांडकी पुन्व,वीर्याच सुईनळ,हिजड्यांचा अपूप उत्साह, भाडयाला सॅडरणे,पॅरॅलिसिसप्रमाणे बर्फाच्छादित,आईबाप नसलेल्या खंदाळलेल्या हजारी,हाडीव्रण,वरंगळणे,टॅकन करणे,कोण्याकरकरीत डोब्डी,असे वानगीदाखल कितीतरी शब्द, नव्या प्रतिमा असे उल्लेख ढसाळांच्या कवितेत येतात.कारण गोलपिठ्यावरील जीवनदर्शन हे मराठी

कवितेत नव्याने आहे. प्रथम आहे.

दलित कवितेने मराठी भाषेला जो शब्दसंग्रह दिला त्यामुळे मराठीभाषा संपन्न झाली आहे. या कवितेची भाषा क्वचित अपरिचित दुर्बोधही वाटण्यासारखी आहे. गोलपिठ्यातील प्रस्तावनेत विजय तेंडुलकर यांनी म्हटले आहे ,[7] " मी प्रथम ढसाळांचे शब्दभांडार जमेल तेवढे माहिती करून घेण्याचे ठरवले. त्याने स्वाधीन केलेल्या कविता एकत्रितपणे वाचल्या, न कळणारे शब्द आणि प्रतिमा बाजूला काढून ढसाळापुढे विद्यार्थ्यासारखा बसलो. ढसाळने मला समजावून सांगितले, एरवी माझ्याशी आदराने बोलणारा ढसाळ यावेळी एका निर्णायक आणि अधिकाराने बोलत होता, कारण ते जग त्याचे होते, त्या जगातील रेषा न् रेषा त्याने जगून टिपलेली होती आणि एवढ्यापुरता त्याचा अधिकार होताच. अज्ञान मी होतो. चंद्रबिंदी म्हणजे काय, डोबडी म्हणजे काय, सादळलेली झाडे म्हणजे काय, डोबडी म्हणजे काय, रांडकीपुनव कशी आणि कुठे असते, खैरबाडे पांजरपोळ डग्गा याचा अर्थ काय, घेडधाय पोटले कशाला म्हणावे, न नष्टचर्य असे एका कवितेत किंवा ऊज-एड असे दुसऱ्या एका कवितेत आवर्जून त्याने का लिहिले, पाणचट गधशी कुठे असते, छप्पन्न टिकली बहुक्कपणा नक्की कसा, मगरमच पल्लियाचा अर्थ काय, कु.अनुराधा बुधाजी उपशाम कोण आणि कोठली, थम घेऊनन म्हणजे काय करून, महारोग्यासारख्या सांडलेल्या झोपड्या यात सांडणे शब्द कशा करता, रायरंदी हाडूक कसे असते, खोडाबेडा हात म्हणजे कसे हात, बिंदाचिंदा हा कोठला शब्द, नेपाळी पोरी डावे उजवे कसे करतात, कंट्रीच्या मसाल्याची मलमोर मल्य हे काय प्रकरण, पिंढ म्हणजे शरीराचा कोठला भाग, डिंगडाग घलिंगाचा शब्दार्थ काय, गुपची शिगा, डेडाळे, डल्ली, सल्ली, बोटी, गुडसे, डोल्बोळ ही कोठली भाषा, अनबन कसे बनवतात -- एक न शंभर गोष्टी.

कवितेमध्ये अशाप्रकारे अपरिचित येणारे शब्द हे काव्यानुभवाच्या अपरिहार्य अभिव्यक्तीमधून आलेले असतात. गायीला उघडणे, खोल पोट असणे

या सारखे शब्दप्रयोग किंवा देशातील लोकांच्या प्रवृत्तीवर टीका करताना, " कांजी सारखी कडक झालेली माणसं " असे शब्द आलेले आहेत. या ठिकाणी एकतर या शब्दाचे वेगळेपण आहे आणि कविता निर्मितीमध्ये असलेले अपरिहार्यपणाही आहे.

ढसाळांच्या कवितेतून येणाऱ्या या शब्दाबाबत विचार प्रकट करताना बाळकृष्ण कवठेकर लिहितात , " अशिष्ट, अश्लील, ओंगळ वाटणारे शब्द ढसाळांच्या कवितेत अपरिहार्य वाटतात ते कवितेचा अविभाज्य घटक ठरतात. दैन्याची दारूणता, दु:खाची तीव्रता, उपरोधाची धार, क्रोधाची आग, आशेची कोमलता या साऱ्यांना ढसाळांच्या शब्दकलेने समर्थपणे अभिव्यक्त केले आहे. बंडखोरीच्या झळाळीने ढसाळांचे शब्द अंतर्बाह्य दीप्तिमान झालेले आहेत. " कवठेकरांच्या या विधानाची सत्यता डसाळांच्या कवितेत ठायी ठायी येते. सत्ताधिशांच्या मनोरंजनाचे लिबलिबीत साधन म्हणून हे लेखन झालेले नाही सबब शब्दांच्या नाजूकतेने कवीचे मन झंकारणे शक्यच नाही.

ढसाळांच्या कवितातून अनेक अपरिचित बोली भाषेतील सहजपणे येतात, परिचित शब्दांचे अनोखे उपयोग होताना दिसतात. पांढरपेशा थाटाने दिमाखाने जपलेली अलवार भाषा, घरंदाज भाषा नामदेव ढसाळ एखाद्या बटकी सारखी वाकवतो. निर्दयपणे तिची मोडतोड करतो. अथवा तिच्यात अशिष्टभर घालून तिचे बुध्दयाच एक विद्रूपरूप करतो. त्यांच्या कवितेच्या आशयासाठी हे सारे त्याला आवश्यक वाटते. हे करताना भाषेचे पारंपारिक सामर्थ्य आणि सौंदर्य त्याना उमजलेले आहे. या त्यांच्या विद्रुप, गंगाजमनी, मोडक्या तोडक्या परंतु अतिशय ओघवत्या आणि मनस्वी भाषेत नामदेव ढसाळ यांचे जगणे एका अनावरपणे व सहजपणे काव्यरूप घेते. या जगण्यातला असह्य दाह कवितारूप होतो. विजय तेंडुलकरांनी त्यांच्या कवितेची तुलना तुकारामांच्या कवितेशी करताना

म्हटले आहे की, तुकारामाच्या आध्यात्मिक नव्हे परंतु काव्यरचनेचा वारसा तिच्यातील उत्स्फूर्त ,रांगडया,रोकडया संतप्ततेसकट ढसाळांची कविता वाचविताना मला भासते..

(नामदेव ढसाळ ग्रामीण बोलीच्या ढंगाने व संवादात्मक पध्दतीने ते कवितेला योग्य साधन म्हणून वापरतात) त्यातून भावनांचे यथायोग्य प्रकटीकरण करतात, साकाळलेल्या धर्मांवर,वर्गीय प्रवृत्तीवर,ढोंगी व्यवस्थेवर, कालबाह्य पारंपरिकतेवर,गुळगुळीतपणावर आणि स्वैराचारी आविष्करणावर ती त्वेषाने हल्ला चढविते, तिला हळुवार भाषेत व लयबध्द रंजक भाव बोलीत,म्हणूनच बोलण्याचे प्रयोजन उरत नाही.यशवंत मनोहर म्हणतात[१] त्याप्रमाणे नामदेव ढसाळांची ही दलित कविता गुंजनाच्या वा रंजनाच्या भाषेत बोलत नाही,ती अपूर्व युध्दकांड होऊनच आल्यामुळे समतेच्या आड येणाऱ्या प्रवृत्तींच्या भंजनाच्या भाषेत बोलते. विद्रोह हाच या कवितेचा आत्मा असल्याने विस्कटलेल्या सांस्कृतिक ताग्यातून पिळवटलेल्या भरड शब्दांची सुटी सुसाट कारंजी, त्यांच्या हृदयातून उसळताना दिसते.

दलित कविता ही शतकानुशतके दु:ख,अपमान,दारिद्र्य,अन्याय व अत्याचार यांच्या आगीतून होरपळून निघालेली आहे. अनेकांना दलितांच्या कवितेतील आक्रस्ताळेपणा समजला नाही. त्यांनी त्याबाबत नापसंतीचा सूर लावला तरी दलित कवींचा संताप,त्यांचा आक्रोश,त्वेष, मोठ्या ललित मधुर शब्दांत व्यक्त होणे शक्य आहे का ? ---- याचा विचार मनाशी स्वत:हून केलेला बरा डॉ.भालचंद्र फडके यांनी टीकाकारांना असा इशारा दिलेला आहे की,पांढरपेशा टीकाकारांनी ही कविता कशातून जन्माला आली हे लक्षात ठेवले पाहिजे. स्वत:ला गांडू म्हणवून घेणाऱ्या षंढ पिढीची ही कविता नाही.प्रस्थापितांच्या

विरुध्द तांडव करणाऱ्या पण सगळेच अर्थहीन आहे, व्यर्थ आहे म्हणून टाचा घाशीत बसलेल्या नपुंसक विद्रोहाची ही कविता नाही. - दलित कवींचा अनुभव जसा नवीन आहे, तसेच त्याने अनुरूप असे भाषेचे माध्यमही स्वीकारलेले आहे. आपल्या अस्तित्वाचा शोध लावून ही कविता जीवनाचा नवा अर्थ लावत आहे. दलित कविता ही सरोस क्रांतीची भाषा बोलते आहे.

दलित लेखक जी भाषा योजतात ती पाहून - पांढरपेशा समीक्षक हादरताना त्यांना वाटते की, अशा अपशब्दांची योजना कवींनी का करावी, पण गोलपिठयाची वा कोंडवाडयाची भाषा ही त्या त्या कवीच्या अनुभवाची भाषा आहे. आपल्याला त्यातील काही शब्द ओंगळ, घाणेरडे वाटतील पण त्यांना विशिष्ट संदर्भ आहे. त्याचे कवीला जे व्यक्त करावयाचे आहे त्याच्याशी नाते आहे. म्हणून दलित कवितेत आढळणाऱ्या शब्दयोजनेचा विचार पारंपरिक पध्दतीने करता येणार नाही. ही शब्दयोजना दलित कवीला जाणवलेला अनुभव गोचर करण्यासाठी केलेली आहे. हे लक्षात घेतले पाहिजे. " ज्यांना शब्द वाटतात केवळ मुखवटे, त्यांना काय आणि कसे सांगावे ? " -- असे हे दलित कवी विचारतात. पाखरासारखे आपले शब्द आकाश शोधीत राहावेत असे वाटणाऱ्या कवीचे मनच वेगळ्या तऱ्हेने घडलेले आहे. आपले मोडके तोडके शब्द असले तरी या आपल्या शब्दाचा कविमनाला अभिमान आहे.

दलित समाजाला स्वतंत्र असल्याचे भान ज्या वेळी आले, त्याच वेळी त्याला स्वतंत्र भाषेचे सामर्थ्यही प्राप्त झाले. शब्द व स्वातंत्र्य हे दोन्ही नेहमीच हातात हात घालून वाटचाल करीत असतात. दलित समाज युगानुयुगे पारतंत्र्यात खितपत होता. त्याला संवेदना होत्या, सुखदुःखे होती, आशा-आकांक्षा होती पण त्यांना अभिव्यक्ती देणारी भाषा नाकारलेली होती. ही परिस्थिती जेव्हा बदलली, तेव्हा स्वातंत्र्य आणि भाषा या दोन्ही गोष्टी एकरूप होऊनच त्याच्या समोर आल्या. दलित साहित्याचा जन्म दलित

स्वातंत्र्याच्या गर्भातून झाला.

नामदेव ढसाळांनी एका कवितेत म्हटले आहे :

" मी तुला शिव्या देतो,तुझ्या ग्रंथाला शिव्या देतो,
तुझ्या संस्कृतीला शिव्या देतो,तुझ्या पाखंडीपणाला
शिव्या देतो
मी हे सारं काही बोलणार नव्हतो पण माझे हात
जागे झालेत ..."
(बेंबीचा देठ ओला होणाऱ्या वयात )

-- " गोलपिठा " -- पृ.२१.

आपले हात जागे झाले, मुक्त झाले व या स्वतंत्र हातांनीच सारे काही बोलण्याची प्रेरणा निर्माण झाली. ही प्रेरणा दलित भाषेची मूलभूत प्रेरणा आहे. ही भाषा स्वातंत्र्याच्या जाणिवेचेच अपत्य आहे -- दलित साहित्याचा जन्म हा स्वातंत्र्याच्या कुशीत झालेला आहे. याचे नेमके चित्र नामदेव ढसाळांनी काढलेले आहे.

"अंधाराने सूर्य पाहिला तेव्हा शब्द हुंकारले " नरकाच्या कोंडवाड्यात किती दिवस राहायचं आम्ही ?"-- या कोंडवाड्यात श्वास घुसमटतात. आजपर्यन्त नष्टचर्याच्या गटारात अगतिकपणे किड्यासारखे सडत होतो आपण.लक्तरांनी अब्रू झाकली,पण ( संस्कृतीच्या ) गोलपिठ्यावर तिची नागवणूक झाली. अशी नागवण करणाऱ्यांचा ऱ्हास आता जवळ आला आहे. मुक्तछंदाच्या संजीवनीने आम्ही जिवंत झालो आहोत. जुलूम कर्त्यांच्या पापाचे छिनाल घाट आम्ही आता फोडणार आहोत. हे सारे शब्दांचे बोल ! जेव्हा अंधाराने सूर्य पाहिला, तेव्हा हे बोल उमटले..."
----- " अंधाराने सूर्य पाहिला तेव्हा " या कवितेतून ( पृ.१६ )

ढसाळांनी हे जे वर्णन केले आहे,त्यात दलित स्वातंत्र्याचा सूर्योदय

नि दलित भाषेचा जन्म याची फकल्पताच स्पष्टपणे जाणवते. स्वातंत्र्य व भाषा याचे रक्ताचे नाते येथे सूचित होते. प्रा.रा.ग.जाधव म्हणतात[10] त्याप्रमाणे या दलित कवीचे आपल्या स्वतंत्र भाषेचे ,स्वतंत्र शब्दाचे भान अभूतपूर्व आहे. असे भान वामन निंबाळकरांनी अचूकपणे व्यक्त केले आहे. (आपल्या " शब्द " या कवितेत ते म्हणतात ---

" शब्दांनीच पेटतात घरेदारे देश
आणि माणसे-सुध्दा
शब्द विझावतात आम्ही
शब्दांनी पेटलेल्या माणसांची
शब्दच नसते तर पहल्या नसत्या
डोळ्यांतून आगीच्या ठिणग्या,
वाहिले नसते महापूर आसवांचे,
आले नसते जवळ कुणी
गेले नसते दूर --

शब्द नसते तर " ( गावकुसाबाहेरील कविता पृष्ठ १ )

या कवितेतील शब्दाचे,भाषेचे तत्वज्ञान हे खास दलित तत्वज्ञान आहे. ही कविता केवळ आलंकारिक नाही.घोषणाबाज नाही. ती मीमांसक आहे. तात्त्विक आहे.)

ढसाळांच्या कवितेतील भाषाही खास तिचीच . तिच्यातून प्रकट होणाऱ्या अनुभवांचीच वाटायला लागते.जखमेतून भळभळा वाहाणाऱ्या रक्ताप्रमाणे किंवा भडकलेल्या आगीतून उडणाऱ्या ठिणग्यांप्रमाणे ढसाळांच्या कवितेच्या भाषेचे रूप आहे. विषाद आणि वेदना,भ्रमनिरास आणि क्रोध यांचे रंग या भाषेने धारण केले आहेत. ती तीव्र,धक्के देणारी, खिजवणारी, शिव्या देणारी असली तरी कृत्रिम वाटत नाही. आक्रस्ताळी,कर्कश,खोटी, प्रचारकी वाटत नाही.(मुख्य म्हणजे ती ढसाळांच्या कवितेची भाषा असावी

तशीच आहे. कारण ती त्यांच्या अनुभवांची जन्मजात भाषा आहे.

## ढसाळांच्या कवितेतील प्रतिमासृष्टी

काव्यभाषा ही प्रतिमांची भाषा असते. ती प्रतिमा सौंदर्यात्म असते. स्वयंभूपणा, मौलिकता आणि सेंद्रियत्व ही तिची वैशिष्ट्ये असतात. प्रतिमेच्या जाणिवेशिवाय आधुनिक कवितेची जाण येऊच शकणार नाही. एवढेच नव्हे तर ज्ञानेश्वर-तुकारामासारख्या प्रतिमासंपन्न कवींच्या कृतीचे अनन्यत्वही काव्यार्थाने जाणता येणार नाही. रूपक, प्रतीक आणि प्रतिमा यांच्या सीमारेषा परस्परांचे अतिक्रमण करणाऱ्या असल्या तरी जेथे कवीच्या भावानुभवच चित्ररूप झाला आहे, जेथे त्याची आत्मशक्तीच रसनीय झाली आहे, जेथे सृजनाला सौंदर्य लाभले आहे तेथे प्रतिमा साकारली आहे असे म्हणता येईल.

विविध संवेदनांच्या विविध प्रतिमा संभवतात. प्रतिमा म्हणजे मानसचित्रे. ती केवळ प्रतिबिंबे नसतात. काही प्रतिमा स्मृतिजन्य असतात तर काही स्वनिर्मित असतात. नव्या प्रतिमा निर्माण करणे हे प्रतिभेचे कार्य असते. प्रतिमांचा अभ्यास कवीच्या व्यक्तित्वावर प्रकाश टाकणारा असतो. सर्वच कवींची प्रतिमा निर्माण क्षमता सारखी नसते. संमिश्र व जटिल प्रतिमांचा प्रत्यय घेणे-येणे सर्वांनाच सहजपणे शक्य नसते. नवकाव्यावर दुर्बोधतेचा आरोप येण्याचे एक कारण म्हणजे ही प्रतिमासंकुलता होय. कवितेत प्रतिमा असतात, एवढेच नव्हे तर संपूर्ण कविता हीच एक प्रतिमा असते. तसेच कवितेतील प्रतिमा कवीच्या व्यक्तित्वाच्या मुशीतून निर्माण होत असल्या तरी त्यांना गोचरत्व शब्दामुळेच प्राप्त होते म्हणून कवितेची भाषा ही प्रतिमांची भाषा असते असे म्हटले जाते. शब्द हे शब्द न उरता प्रतिमा होऊनच -- सामोरे येतात. प्रतिमांची भाषा ही कवीच्या अंतरंगाशी निगडित असते.

SHIVAJI UNIVERSITY * KOLHAPUR

शैलीप्रमाणेच प्रतिमाही व्यक्तिमत्वला प्रत्यय निरंतर देत असतात.)

प्रतिमा आणि कवितांचा विचार करतांना मर्ढेकर पूर्व मराठी कविता आणि मर्ढेकरांची नवकविता इथे प्रतिमाकडे पाहाण्याची दृष्टीच बदललेली आहे. भिन्न प्रकारच्या प्रतिमा एकत्र आणणे, रूपकाश्री प्रतिमा वापरणे, प्रतिमा संघात वापरणे इ.वैशिष्टये मर्ढेकरापासून दिसतात. दलित कवितेमध्ये येणाऱ्या प्रतिमांच्या मध्ये या दृष्टीने प्रतिमांची गुंतागुंतीची रचना दिसत नाही. त्या प्रतिमा सरळसोट आहेत. कवीच्या मनातील आशयाला सरळसोटपणे सामोऱ्या जाणाऱ्या आहेत. प्रतिमांचा मुख्य गुणधर्म म्हणजे त्या अर्थघन ( Evocative ) व कवीच्या अनुभूती उत्कटतेने ( Intense ) व्यक्त करणाऱ्या असाव्या लागतात. या दृष्टीने दलित कवितेतील प्रतिमा या अर्थघन आहेत. किंबहुना दलित कवितेला असलेले वैचारिक अंग आणि तिची भावनिक बाजू स्पष्ट करणाऱ्या आहेत. बुबुळभर झालेली भीती,सातनंबर विडल सारखं बेकाळ बांडगूळ,मटनाचा रस्सा खाल्ल्यासारखं तरतरीत होणारं मन इ.प्रतिमा या आशय संपृक्त आहेत. कवींच्या काव्यातील प्रतिमा ह्या आशयघन आहेत. जीवनानुभवातून आलेल्या आहेत आणि अनुभूतीचा उत्कट भाग म्हणून त्या आलेल्या आहेत.

(नामदेव ढसाळांच्या कवितेबाबत प्रतिमासृष्टी महत्वाची आहे. ढसाळांच्या कवितेतून प्रकट झालेल्या अभिव्यक्तिविशेषा प्रमाणेच त्यांच्या प्रतिमासृष्टीचाही एकूण दलित कवितेवर फार प्रभाव पडला आहे.

प्रतिमांच्या भाषेत ढसाळांची कविता बोलते "छप्पन्न टिकली बहुचकपणा","पाणचट गवशी सारखे थेर ","कंद्रीच्या मक्षाल्याची मलभोर मल्य","जिवाचे नांव लवडा ठेवून जगणारे " -- पांढरपेशाच्या मनांचा थरकाप करणाऱ्या प्रतिमा जशा आहेत तशाच "रक्तात पेटलेले सूर्य,""पिसाळलेला जाळ," "पापाचे चिनाळ घट"," लाच खाल्लेला दिवस ","वास्तविकाची वाळवी", "शिंदळीचे सात घोडे " -- या सारख्या प्रतिमा त्यांच्या कवितेत आहेत.)

त्या साऱ्या प्रतिमा म्हणजे मूलत: ढसाळांचे अनुभवच असल्याने त्या ढसाळांच्या कवितेला आणि तिच्यातील प्रतिक्रियानाही काव्यात्मकतेच्या पातळीवर नेतात.

कवितेच्या भाषेबाबत, तिच्या रचनेबाबत ढसाळ अनेकदा जाणीवपूर्वक प्रयोग करताना दिसतात पण हे प्रयोग उपरे नाहीत. "माणस", "थू: तुझ्यावर त थु:थ:थु", "आभाळ" इ. या कवितामध्ये आलेल्या प्रतिमा सर्वस्वी नवीन आहेत. हडळीचा, ताफा, लोफर झालेला सूर्य, चिल्बटलेलं चिरगूट अशा कितीतरी आहेत.

(ढसाळांनी अनुभवदर्शन घडविताना या वापरलेल्या प्रतिमा त्यांच्या जीवनानुभवातून असल्यामुळे नाविन्यपूर्ण आहेत). काही समीक्षक दलित कवितेत आशयाचा तोच तो पणा येतो असे म्हणताना दिसतात. त्यानी दलित कवितेमधील या प्रतिमा पाहिल्या की, आणि एखाद्या प्रतिमेचा वेगवेगळेपणाने केलेला वापर तपासला की, आपल्या म्हणण्यात काहीच तथ्य नाही हे त्याचे

१ त्यानाच कळेल. ("आई" ही एकच प्रतिमा या दलित कवींनी वेगवेगळ्यापणाने आपल्या वेगवेगळ्या कवितातून मांडलेली दिसते. नामदेव ढसाळ "आईच्या समजुतीसाठी" जी प्रतिमा उभी करतात ती दुबळी नाही, अगतिक नाही, लाचार नाही. माणसाला अन्याया विरूध्द झगडण्यासाठी जे स्वातंत्र्य धैर्य हवे असते, ते धैर्य आपल्या मुलामध्ये निर्माण करणारी ती आहे. आईच्या अश्रूमध्ये हिरोशिमा पेटविण्याचे सामर्थ्य आहे. अशी ही आईची प्रतिमा मोठी कणखर, जिद्दी आहे. काबाडकष्ट, दैन्य, अंधार वाट्याला आलेल्या या आईची प्रतिमा मात्र जिद्दी, कणखर आणि न वाकणारी आहे. आपल्या पोटाला चिमटे घेऊन, ज्याच्या मुखामध्ये भाताची चार शिते भरविली, आयुष्याच्या उलाढालीमध्ये तळहाताच्या फोडासारखे जपून वाढविले तो तिचा पुत्र संस्कृती, रूढी, परंपरा आणि येथील व्यवस्थेच्या समर्थकां विरूध्द आवाज करून उठलेला आहे.)

कवीची अनुभव घेण्याची पध्दत आणि त्यातून व्यक्त व्यक्त होणारी

प्रतिमा ही देखील तो नेमकेपणाने व्यक्त करणारी आहे.

(" सूर्य " प्रतिमा आणि "झाडा" ची प्रतिमा या कवितामध्ये सातत्याने आणि वेगवेगळेपणाने आलेली आहे. ही कविता " सूर्या" ची पूजा करणारी, सूर्याची वाट पाहणारी आहे. अनेक अर्थानी वे वेगवेगळ्या त-हांनी या प्रतिमा आल्या आहेत. आशयाच्या दृष्टीने तर संपृक्त अशा या कविता तर आहेतच पण कवितेत कलात्मकतेची सुंदर जाणीव ही आहे.)

दलित कवितेमध्ये येणा-या प्रतिमा ह्या त्याच्या जीवनानुभवातून निर्माण झालेल्या आहेत असे दिसते. त्यातही दलित कवींची सामाजिक जाणीव ही प्रामुख्याने तीव्र आहे. त्यामुळे " झोत भट्टीत शेकावे पोलाद तसे आयुष्य छान शेकले जाणे " " थुकलेल्या तिस-या पाळीचे कामगार घरात यावेत तसे मनामध्ये विचार येणे " -- ह्या प्रतिमा जशा सुर्व्यांच्या कवितेत त्यांच्या जीवनानुभवातून आलेल्या आहेत, तशाच त्या नामदेव ढसाळादी इतरही अनेक कवींच्या जीवनानुभवातून आलेल्या आहेत. ढसाळांच्या कवितेतील "कंट्रीच्या मसाल्याची मलमोर मल्य", "शिवाचे नांव लवडा ", " लाच खाल्लेला दिवस ", "दारिद्रयाचे स्वतंत्र शेत", "वास्तविकतेची वाळवी" अशी अनेक प्रतिमांची उदाहरणे देता येण्यासारखी आहेत. अलीकडील दलित कवींनी या कवितेला अशी वेगवेगळी रूपे दिलेली आहेत. अर्थवाही प्रतिमा त्यामध्ये आहेत.

दलित कवितेत येणा-या प्रतिमा ह्या वेगवेगळ्या अर्थांनी व वेगवेगळ्या त-हांनी येताना दिसतात. उदाहरणादाखल दलित कवितेत येणारी सूर्यप्रतिमा ही प्रतिमा अनेक अर्थांनी व वेगवेगळ्या त-हानी आली आहे.

" प्रखर तेजाने तळपणारा सूर्य
केव्हाच अस्तास गेला आहे " ( दया पवार )

" पुढच्या निष्णात सुइणीनं
उद्याच्या सूर्याचं बाळंतपण
आमच्यासाठी केलं तर
तिला चोळी बांगडी करण्याचं सत्कार्यही
आपल्या घराघरांत होईल " ( प्रल्हाद चेंदवणकर )

" नव्या सूर्याला
प्रवेश नाही
येथे साम्राज्य आहे पूर्वपूजेचे
केवळ काळोखाचे
काजळलेल्या ठिसाळाचे " ( विलास राशिनकर )

" आता सूर्यफुला सारखे सूर्योन्मुख झालेच पाहिजे "
" अंधाराने सूर्य पाहिला तेव्हा "
" रक्तात पेटलेल्या अगणित सूर्यांनो "
( नामदेव ढसाळ )

या शिवाय ढसाळांच्या कवितेतील" सूर्यफुले हाती ठेवणारा फकीर " या सारखी प्रतिमाही दिसते. सारांश इतकाच की दलित कवितेतून येणाऱ्या या सूर्यप्रतिमा फसारलेल्या नाहीत.

चंद्र,सूर्य,खळाळणारा समुद्र,निसर्ग किंवा झाडापानांच्या सहवासात ही कविता रमू शकली नाही. तो तिचा पिंडही नव्हे. मराठी कवितेला आता पर्यन्त अपरिचित असलेल्या अनुभव क्षेत्रात आणि शब्द , प्रतिमांच्या क्षेत्रात विशाल दालन खोलून ही कविता जाणिवांचे क्षेत्र समृध्द करीत चालली, निसर्गापेक्षाही माणूस म्हणून जगण्याचे ज्वलंत प्रश्न या कवितेने जे उभे केलेले आहेत ते मराठी कवितेत भर घालणारे ठरले आहेत. नामदेव ढसाळांच्या कवितेतील अनेक शब्द,प्रतिमा न कळूनही विजय तेंडुलकरांना ही कविता अस्सल

SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

कसदार आणि अस्वस्थ करणारी वाटते. हे जग ज्याचे आहे, त्या जगाची रेषा न् रेषा त्यांनी जपून टिपलेली आहे आणि म्हणून तेंडुलकरांच्या प्रमाणेच प्रत्येक रसिक वाचकाला नामदेव ढसाळांच्या कवितेतील शब्द, प्रतिमा कळत नाहीत आणि तरीही त्यांची कविता अस्सल, कसदार आणि अस्वस्थ करणारी आहे याचा अनुभव येतो.

दलित जाणिवांची एक विलक्षण कलात्मक अभिव्यक्ती म्हणजे त्यांच्या चित्रप्रतिमा होत.दलित चित्रकला व दलित काव्य या दोहोंना परस्परांचा फायदा मिळवून देण्याची अनन्यसाधारण प्रतिभा नामदेव ढसाळांना लाभली आहे. मराठीत तरी हे दृश्य अगदी अपूर्व आहे. ढसाळांची कविता म्हणजे एक प्रकारचे चित्रकलात्मक कॉंपोझिशनच आहे.त्यांच्या एका कवितेचे नाव तर " मंदाकिनी पाटील, मला अभिप्रेत असलेले एक कोलाज" असेच आहे.तसेच रंगाच्या प्रतिमा त्यांच्या कवितेत आढळतात.काव्य आणि चित्र यांना एक खास दलित आकार देण्याचे सामर्थ्य ढसाळांच्या चित्रातून दिसून येते.

दलित साहित्य व दलित चित्रकला यांना परस्परांचा उपयोग करून पुढे जाण्याची एक संधी लाभली आहे.मराठीत केशवसुतांचा नवा शिपाई किंवा बालकवींची फुलराणी किंवा तांब्याची नववधू, माधव ज्यूलियनांची विरहिणी यांना मराठी चित्रकार लाभले नाहीत.दलित कला साहित्यक्षेत्री या दोन कलांची देवघेव होत राहिली, तर या प्रारंभीच्या काळात ते समर्थनीय ठरेल असा आशावादी सूर प्रा.रा.ग.जाधव[11] यांनी व्यक्त केला आहे.

आपल्या "गोलपिठा" या काव्यसंग्रहाचे मुखपृष्ठ स्वत: कवीनेच म्हणजे नामदेव ढसाळांनीच रेखाटलेले आहे. पाठमोऱ्या निद्रिस्त अशा विवस्त्र स्त्रीचे चित्र त्यांनी अशा कुशलतेने रेखाटले आहे, की ते - सृष्टीचे प्रतीक ठरावे, तिच्या योनीतून अवतरलेल्या फांदीला चार किरकोळ फुले व एक मानवी कवटीही लटकलेली आहे. आजवरच्या मानव संस्कृतीचे किरकोळ संचित

व त्यातून मुडद्यासारखी जगविलेली दलित व्यक्ती याचे सूक्ष्म दर्शन ढसाळांचे हे छोटे रेखाटन घडविते.

(दलित काव्यात नव्या नव्या प्रतिमा अवतरत आहेत. अशा प्रतिमा म्हणजे शब्द माध्यमातील चित्रेच होत.)

संदर्भ, टीपा इ.


१ मनोहर यशवंत - स्वाद आणि चिकित्सा, धनंजय प्रकाशन, नागपूर, जानेवारी ७८, पृ.९८-९९.

२ जाधव रा.ग. - निळी पहाट, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, द्वि.आ.जून १९७९, पृष्ठ ५२-६२.

३ कुंभोजकर ललिता - दलित कविता : एक दर्शन प्रतिमा प्रकाशन, पुणे, फेब्रु.८४, पृष्ठ ४६-४७.

४ फडके भालचंद्र - दलित साहित्य : वेदना व विद्रोह श्रीविद्या प्रकाशन, पुणे, डिसें.१९७८,

५ कवठेकर बाळकृष्ण - दलित साहित्य : एक आकलन, अजब पुस्तकालय, प्रकाशन, कोल्हापूर, जानेवारी १९८१, पृष्ठ २८-२९

६ खरात शंकरराव - दलित वाङ्मय: प्रेरणा व प्रवृत्ती, इनामदार बंधु प्रकाशन, पुणे, मार्च ७८, पृ.१२१.

७ तेंडुलकर विजय - गोलपिठा, नीलकंठ प्रकाशन, पुणे ३०, १९७५, प्रस्तावनेतून.

८ कवठेकर बाळकृष्ण - दलित साहित्य : एक आकलन, अजब पुस्तकालय, प्रकाशन, कोल्हापूर, जानेवारी १९८१, पृ.२८

९ मनोहर यशवंत - स्वाद आणि चिकित्सा, धनंजय प्रकाशन, नागपूर, जाने.७८, पृष्ठ ९९.

१० जाधव रा.ग. - निळीपहाट, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, द्वि.आ. जून १९७९, पृष्ठ ३८.

११ जाधव रा.ग. - तत्रैव , पृष्ठ ५०.